जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 OCT 2019
तरुण भारत

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वैश्विक

## प्रा. सर्जेराव पद्माकर: प्रा. अंबपकर यांच्या 'आंबेडकरनिस्ट अणि कम्युनिस्ट' पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कार्ल मार्क्स भांडवलदारांची व्यवस्था मांडतो, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामान्य माणसांचे प्रश्न मांडतात. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार वैश्विक आहेत, असे प्रतिपादन प्रा. सर्जेराव पद्माकर यांनी केले. आंबेडकरनिस्ट आणि कम्युनिस्ट पुस्तक प्रकाशन सोहळ्यात पद्माकर बोलत होते.

पँथर राजा ढाले यांच्या जयंतीचे औचित्य साधून फुले-आंबेडकर विचारधारा आणि पहिली ऐतिहासिक माणगाव परिषद शताब्दी महोत्सव समितीच्यावतीने सोमवारी शाहू स्मारक येथे प्रा. जी. बी. अंबपकर यांच्या 'आंबेडकरनिस्ट आणि कम्युनिस्ट" या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी दलित पँथरचे ज. वि. पवार, जी. बी. अंबपकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर: 'आंबेडकरनिस्ट आणि कम्युनिस्ट' पुस्तकाचे प्रकाशन पँथर ज. वि. पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी मधुकर कांबळे, प्रा. जगन कराडे, बापूसो माने, प्रा. जी. बी. अंबपकर, प्रा. सर्जेराव पद्माकर.

प्रा. सर्जेराव पद्माकर म्हणाले, कोणतीही हानी न करता माणसाला सन्मान मिळाला पाहिजे हे बुद्ध तत्वज्ञान असून डॉ. आंबेडकर यांनी बुद्ध तत्वज्ञान स्वीकारले. नक्षलवाद आंबेडकरी चळवळीला घातक आहे. आंबेडकरी चळवळीतील उमद्या तरुणांना नक्षलवाद खेचत असून त्यांना थांबवण्याची गरज आहे.



तंत्रज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठ

1 OCT 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सामाजिक न्यायासाठी राजा ढालेंचा संघर्ष

## - ज. वि. पवार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मंत्रिपद, खासदारकी अशा क्षणभंगुर आमिषाच्या मोहात न पडता सामाजिक न्यायासाठी प्रस्थापितांविरोधात अखेरपर्यंत संघर्षाचा निर्धार राजा ढाले यांचा होता आणि त्यांनी तो अखेरच्या श्वासापर्यंत निभावला, असे प्रतिपादन दलित पँथर चळवळीचे प्रवर्तक व ज्येष्ठ विचारवंत ज. वि. पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने 'दलित चळवळ ते आंबेडकरी चळवळ : पँथर राजा ढाले यांचा परिप्रेक्ष्य' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

ज. वि. पवार म्हणाले, राजा ढाले यांचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान हे त्यांनी आंबेडकरी चळवळीला दिलेल्या योगदानाइतकेच महत्त्वाचे आहे. किंबहुना या चळवळीला वैचारिक अधिष्ठान देण्याचे काम त्यांनी आपल्या साहित्यातून केले. दलित साहित्याचा उगम झाला, त्यावेळी राजा ढाले यांनी पुढे होऊन त्या चळवळीला रक्षण पुरविले नसते, तर त्या चळवळीची तेव्हाच भ्रूणहत्या झाली असती, हे वास्तव आहे. त्यांचे हे योगदान कोणालाही नाकारता न येणारे आहे. दलित साहित्याच्या टीकाकारांना



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत ज. वि. पवार. शेजारी डॉ. हरिश भालेराव व डॉ. जगन कराडे.

सडेतोड शब्दांत प्रत्युत्तर देऊन त्यांनी त्यांची तोंडे बंद केली.

लघु अनितकालिक चळवळीच्या विद्यापीठाचे राजा कुलगुरू होते. या लढ्याला महत्त्व प्राप्त करून देणारे 'विद्रोह' हे अनियतकालिक त्यांनी सुरू केले आणि तेव्हापासून मराठी साहित्यात दलित साहित्याची लाट निर्माण झाली. या चळवळीला दलित हे संबोधन असले तरी व्यवस्थेने लादलेले हे दलितत्व झुगारून त्यापासून उन्नत होण्यासाठी राजा ढाले सातत्याने आग्रही राहिले.

डॉ. हरिश भालेराव म्हणाले, राजा ढाले यांनी माणुसकीचा पाणउतारा करणारी व्यवस्था नाकारण्याचे बळ शोषित समाजात निर्माण केले. दलित ही नकारात्मक ओळख करून देणारा शब्द आम्ही राजा ढाले यांच्याच प्रेरणेने नाकारला. वैचारिक चळवळ केल्याखेरीज प्रस्थापितांविरोधातील बंड यशस्वी होऊ शकत नाही, याची जाणीवनिर्मिती ढाले यांच्या चळवळीने केली, हे त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

यावेळी केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, रमेश शिपूरकर, प्रा. विनय कांबळे, नामदेवराव कांबळे आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात बाल लैंगिक शोषणावर कार्यशाळा

**उजळाईवाडी, ता. ३०** : शिवाजी विद्यापीठांतर्गत बेटी बचाओ अभियानातर्फे सेन्सिटायझिंग ऑन चाइल्ड अब्युझ विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. विद्यापीठाच्या समाजशास्त्र व शिक्षणशास्त्र अधिविभागातर्फे त्याचे आयोजन केले होते. ज्युवेनिअल जस्टिस बोर्डच्या मुख्य न्यायाधीश मधुमिता निकम प्रमुख पाहुण्या होत्या. प्रा. डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते.

श्रीमती निकम यांनी मुलांसोबत गैरवर्तनाविषयी कायद्याची माहिती दिली. डॉ. कराडे यांनी बालकांवरील अत्याचार व शिक्षक, पालक यांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. सूरज सापळे यांनी बाल लैंगिक शोषण विषयाची समज, व्यक्तिगत सुरक्षा व लैंगिक शोषणाबाबत मुलांची हकीकत, त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन याचे प्रशिक्षण दिले. या वेळी शिक्षणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. पाटणकर उपस्थित होत्या. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कविता वडराळे यांनी आभार मानले.



**रमणमळा : संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत यश मिळविलेले शिंदे सरकार महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राध्यापक.**

# संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत शिंदे सरकार महाविद्यालयाचे यश

**रमण मळा :** शिवाजी विद्यापीठाने राबविलेल्या रिसर्च सेंसिटायझेशन स्कीम फॉर कॉलेज स्टुडंट उपक्रमांतर्गत शहाजी महाविद्यालयात संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धा झाली. यात डी. डी. शिंदे सरकार महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळविला. यात कुणाल कांबळे, मोहिनी मगदूम, स्नेहल पाटील, अस्मिता गुरवने सादरीकरण केले. 'मिड डे मिल स्किम इन कोल्हापूर सिटी विथ स्पेशल रेफरन्स टू विद्यापीठ हायस्कूल' या विषयात संशोधन प्रकल्प सादर केला होता. डॉ. आर. वाय. माने, डॉ. अमिता कणेगावकर यांचे मार्गदर्शन, तर संस्थाध्यक्षा माधुरी शिंदे, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे यांचे प्रोत्साहन लाभले.

# 'मुधोजी', 'यशवंतराव चव्हाण', 'शिवराज', खाडे महाविद्यालय हॉकीच्या उपांत्य फेरीत

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय पुरुष हॉकी स्पर्धेत मुधोजी, यशवंतराव चव्हाण, शिवराज आणि स. ब. खाडे महाविद्यालयाने उपांत्य फेरीत आज धडक मारली. मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर स्पर्धेचे आयोजन केले. जिल्हा क्रीडाधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे, संजीवन स्कूल ग्रुपचे अध्यक्ष पी. आर. भोसले, विजय साळोखे-सरदार यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. या वेळी अनिल परांडेकर, क्रीडा मार्गदर्शक उदय पवार, रणजित इंगवले उपस्थित होते.

गडहिंग्लजच्या शिवराज महाविद्यालयाचा ऐतवडे खुर्दच्या वारणा महाविद्यालयाविरूद्धचा सामना पूर्ण वेळेत १-१ ने बरोबरीत राहिला. तो पेनल्टी स्ट्रोकवर 'शिवराज'ने सहा विरुद्ध पाच गोलफरकाने जिंकला. त्यांच्या बाळासाहेब चिताडे, सचिन जाधव, वैभव सुतार, गोवर्धन लोहारने, तर 'वारणा'कडून रोहित सकटे, किरण दळवी, गणेश बिराजदार, प्रवीण गायकवाडने चांगला खेळ केला. दुसऱ्या सामन्यात 'शिवराज'ने विवेकानंद महाविद्यालयावर २-० ने मात केली. त्यांच्या सचिन जाधव व महेश देसाईने गोल केला. शहाजी छत्रपती महाविद्यालयाने डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ३-० ने पराभव केला. त्यांच्या शुभम परीटने दोन, तर सिद्धेश डोंगरेने एक गोल केला. फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने पेठ वडगावच्या विजयादेवी यादव महाविद्यालयाला ३-०ने हरविले. त्यांच्या निशांत गायकवाडने दोन व रोहित ननावरेने एक गोल केला. इस्लामपूरच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने इचलकरंजीच्या जयवंत महाविद्यालयाला ३-० ने पराभूत केले. त्यांच्या बाबू शेख, सुव्हेव माळी, रोहन माने यांनी गोल केला. स. ब. खाडे महाविद्यालयाने शहाजी छत्रपती महाविद्यालयाला १-० ने हरविले. गणेश पाटीलने केलेला गोल निर्णायक ठरला.



**जरगनगर : मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियमवर आयोजित शिवाजी विद्यापीठांतर्गत आयोजित आंतर विभागीय हॉकी स्पर्धेचे उद्घाटन करताना जिल्हा क्रीडाधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे.**

# कुंभी येथे विद्यापीठीय विभागीय कुस्ती स्पर्धेस प्रारंभ

## तीन जिल्ह्यांतील २०० पुरुष, तर १०० महिला मल्लांचा सहभाग : दिवसभरात फ्री स्टाईल स्पर्धा

कुडित्रे, ता. ३० : कुंभी कुस्ती संकुल येथे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा (पुरुष) फ्रीस्टाईल व ग्रीको रोमन व महिला फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेला आज प्रारंभ झाला. ७६ किलो वजनी गटात पैलवान सुकन्या पहिल्या हाफमध्ये आक्रमक कुस्ती करत आघाडीवर होती.

विरुद्ध पैलवान ऋतुजा पाटील हिने दुसऱ्या हाफमध्ये आघाडी मिळवली. फ्रंट सालतू डावावर सुकन्याला ऋतुजाने चितपट केले. के. बी. पी. कॉलेज इस्लामपूरची ऋतुजा पाटील प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. शिवराज कॉलेज गडहिंग्लज सुकन्या खामकर द्वितीय तर हर्षदा घोरके तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.



**कुंभी : येथे शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन करताना पै. नामदेव मोळे. सोबत पी. जी. शिंदे, अशोक पाटील, संभाजी वरुटे, तानाजी पाटील, बाजीराव पाटील आदी.**

इतर गटातील निकाल असा : ५० किलो - ऋतुजा मांढरे, ज्योती शिंदे, कोमल जाधव. ५३ किलो - श्रद्धा बेडे, विजया पवार, अश्विनी निकम. ५५ किलो - अश्विनी यादव, शिवानी पाटील, वैष्णवी लाड. ५७ किलो - स्वरागिनी माने, विजया पुजारी, गौरी पाटील, ५९ किलो - प्रेरणा गायकवाड, प्रणोती जाधव, शीतल पाटील. ६२ किलो - अंकिता फातले, मेघा चव्हाण, दिव्या कुंभार. ६५ किलो - स्मिता माळी, धनश्री पाटील, ऋतुजा शिंदे, ६८ किलो - ऋतुजा संकपाळ, ७२ किलो - प्रियांका दुबले.

स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यांतील २१० पुरुष व १०० महिला मल्लांनी सहभाग घेतला असून ही स्पर्धा तीन दिवस चालणार आहे.

महाराष्ट्र केसरी पै. नामदेव मोळे यांनी स्पर्धेचे उद्घाटन केले. महाराष्ट्र केसरी पै. नामदेव मोळे, क्रीडा अधिकारी बालाजी बरबडे, ज्ञानसाधना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पी. जी. शिंदे, स्वप्नील शिंदे, विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक पी. टी. गायकवाड, संभाजी वरूटे यांच्या उपस्थितीतीत झाला. आज दिवसभर महिलांच्या फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धा बुधवारपर्यंत (ता. २) चालणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 OCT 2016
तरुण भारत

# डॉ. जगन्नाथ पाटील जपानच्या शैक्षणिक गुणवत्ता विशेषज्ञपदी

कोल्हापूर : कोल्हापूरचे सुपुत्र, शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विभागाचे विद्यार्थी आणि नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांची जपान सरकारच्या राष्ट्रीय



शैक्षणिक गुणवत्ता मूल्यांकन संस्थेने एक वर्षासाठी विशेषज्ञपदी निवड केली आहे. अशा प्रकारची निवड होणारे ते पहिलेच आहेत. डॉ. पाटील हे जागतिक शिक्षण तज्ञ म्हणून कार्यरत आहेत. या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातून त्यांचे कौतुक होत आहे. डॉ. पाटील यांनी अनेक महाविद्यालयांचे समन्वयक व प्रभारी सल्लागार म्हणून कार्य केले आहे. ते एशिया पॅसिफिक नेटवर्क असोसिएशनचे चौथे आणि पहिले भारतीय अध्यक्ष राहिले आहेत. इंटरनॅशनल नेटवर्क फॉर क्वॉलिटी अश्युरन्स एजन्सीज इन हायर एज्युकेशनचे पहिल्या आशियाई अध्यक्षपदाची धुरा त्यांनी सांभाळली आहे. ऑस्ट्रेलिया सरकारने त्यांच्या कामाचा एन्डेव्हर अवॉर्ड देऊन सन्मान केला आहे. यासारख्या विविध कार्यांनी डॉ. जगन्नाथ पाटील यांची 'द व्हाईस ऑफ एशिया' अशी ओळख निर्माण झाली आहे. जपान सरकारने त्यांना दिलेल्या या जबाबदारीने कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.